:

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.
**सामान्य प्रशासन विभाग** (आस्थापना -४)
दूरध्वनी क्रमांक- ०२१७ -२७४०३००
( ईमेल :- smcgados2@gmail.com)

---

जा.क्र.सआस/ विवक्षित-जाहिरात/काकजस/आस्था-2 /310 दि.29/10/2025. E-

प्रति,

1) कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी, सो.म.पा.

2) संगणक प्रोग्रामर,सो.म.पा.

विषय :- जाहीर प्रसिध्दीकरण करणेबाबत...

सोलापूर महानगरपालिकेतील नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता, मुख्यलेखापाल व अतिक्रमण विभागाकडील विवक्षित कामकाजासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांच्याकडून अर्ज मागविणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

उपरोक्त मान्यतेनुसारची जाहिरात सोबत जोडलेला असून सदरची जाहीरात जादा खप असणारे एक राज्यस्तरीय व एक स्थानिक वृत्तपत्रातून एक वेळ प्रसिध्द करणेत यावेत.

संगणक प्रोग्रॅमर यांनी सदरचे जाहिरात सोबत जोडणेत आलेल्या असून म.न.पा. संकेतस्थळावर प्रसिध्द करणेची कार्यवाही ठेवण्यात यावे.

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उप- आयुक्त(सा.प्र.वि.)
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.

सामान्य प्रशासन विभाग

दूरध्वनी क्रमांक- ०२१७ -२७४०३००

---

जा.क्र.सआस/विवक्षित कामे/जाहिरात/आस्था-2/३०८ दि.29/10/2025 E- 2101825

---

संदर्भ :- १. क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.- ३७/आस्थामं.(का १३),दि. १०/०६/२०२५ रोजीचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय.

२. मा.आयुक्त यांचे दि.२१/०९/२०२५ रोजीचे आदेश (E-२१०१८२५, नोट क्र.१३)

## -: जाहीर प्रसिध्दिकरण :-

**WALK - IN- INTERVIEW**

दि.०६/ ११/२०२५, वेळ :- १२:०० वाजतां

( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी - १०.०० ते १२.००)

**स्थळ :- सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार विवक्षित कामकाजाकरीता सेवानिवृत्त अधिकारी यांची (वर्ग १ व २ मधील) सेवा घेणेबाबत शासन निर्णय निर्गमित झालेले आहे. त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेतील विविध विभागाकडील विवक्षित कामकाज पाहण्याकरीता पदाच्या समोर दर्शविलेल्या कामकाजाचा अनुभव असलेल्या इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | सेवानिवृत्त अधिकारीचा वर्ग- अ / ब | भरावायाची पदाची संख्या | विवक्षित कामकाजाचे स्वरूप | अनुभव |
|---|---|---|---|---|
| 1 | तांत्रिक संवर्ग | 02 (पाणीपुरवठा-१ आपत्कालीन-१) | १. प्रशासकीय कामाचा, सोलापूर शहरातील पाणीपुरवठाबाबत, - ०१<br>२. आपत्कालीन कामकाजाचा अनुभव असलेले - ०१ | किमान ०५ वर्षे संबंधित कामकाजाचा अनुभव आवश्यक |
| 2 | विगर तांत्रिक संवर्ग | 02 (अतिक्रमण-१ लेखापरिक्षण-१) | १. प्रशासकीय कामाचा, अतिक्रमण विभागाचा, मोकाट जनावरे पकडण्याचा अनुभव असलेले- ०१<br>२. लेखा परिक्षण कामाचा अथवा लेखाधिकारी कामाचा अनुभव असलेले -०१ | किमान ०३ वर्षे संबंधित कामकाजाचा अनुभव आवश्यक |

अटी व शर्ती :-

१) क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.- ३७/आस्थामं.(का १३),दि. १०/०६/२०२५ रोजीचे मधील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच नेमण्यात येणा-या अधिका-यांचे मासिक परिश्रमिक/ मानधन उपरोक्त शासन निर्णया प्रमाणे करण्यात येईल.

२) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

३) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीरकरणे आवश्यक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

८) सदरची सेवा ही सहा महिने पासून ते तीन वर्षाच्या मर्यादेकरीताच राहणार आहे. तथापी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिका-यांच्या करार पदधतीमधील कामकाजाचे मुल्य मापन प्रतिवर्षी करण्यात येईल.कामकाज उत्कृष्ठ असल्यावरच त्यांना पुढे मुदत वाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

९) सोलापूर शहरातील सेवानिवृत्तअधिकारी यांना प्राधान्य राहिल.

(डॉ.सचिन ओम्बासे, भा.प्र.से.)
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका.**